# जिल्हाधिकारी कार्यालय,अकोला.

दुरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007
email address - rdc_akola@rediffmail.com web address : www.akolanic.in

क्र.कक्ष-सेतू/कावि- 5096 /2017

दिनांक: 27/09 /2017

## जिल्हा सेतू समिती तथा अध्यक्ष जिल्हा सेतू समिती,अकोला यांचे मार्फत एकात्मीक बाल संरक्षण योजनेंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाकरिता सेवानुबंधानुसार (कंत्राटी) पदभरती-2017

## उमेदवारांना सूचना

उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने संगणकावर भरलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे त्यांना परिक्षेस पात्र समजून तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणीक व इतर आवश्यक कागदपत्रे (जाहिरातीत प्रसिध्द केल्यानुसार पदनिहाय आवश्यक अर्हता) पडताळणीच्या अधिन राहून परिक्षेस बसण्याची अनुमती देण्यात येत आहे. उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकिची अथवा खोटी आढळुन आल्यास त्याच वेळी उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, या कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या जाहीराती नुसार अर्ज सादर केलेल्या **उमेदवारांच्या लेखी परिक्षेचा दिनांक 14 ऑक्टोंबर,2017** ठेवण्यात आलेला आहे.

परिक्षेसंबंधात सर्व सूचना वेळ इत्यादी बाबत या कार्यालयाचे संकेतस्थळावर वेळो-वेळी अवगत करण्यात येईल. परिक्षेसंबंधाने या कार्यालयास प्रत्यक्ष विचारपुस करण्याची आवश्यकता नाही. परिक्षेचा दिनांक अथवा तत्सम बाबींमध्ये बदल करण्याबाबत सर्व अधिकार मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतू समिती,अकोला यांनी राखुन ठेवले आहेत, याची नोंद घ्यावी.

(मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष)
जिल्हा सेतू समिती यांचे आदेशान्वये)

27.9.17

(श्रीकांत देशपांडे)
नि.उ.जि.तथा सचिव,
जिल्हा नियोजन समिती,अकोला.